## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 15/03/2020 (रविवार)
## (दुपार)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. नरखेड :– दिनांक 02/05/2018 ते दिनांक 06/01/2020 चे 21.00 वा. ते 07.00 वा. सुमारास 26 वर्षीय पिडीत/ फिर्यादी हीला आरोपी नामे– क्र. 1) राहुल विनोद पराते याने पीडितेच्या फेसबुक अकाउंटवर संपर्क करून प्रेम जाळयात ओढून व लग्नाचे आमीष दाखवून तिच्या ईच्छेविरूद्ध वारंवार वेगवेगळया ठिकाणी शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. यानंतर आरोपी क्र. 1 ने लग्न करण्यास स्पष्ट नकार दिले. तसेच आरोपी क्र. 2) विनोद पराते व 3) सौ. लक्ष्मी विनोद पराते, तिन्ही रा. खंडेलवाल लेआउट, नरखेड यांनी पीडितेला 'तुझे लग्न आरोपी क्र. 1 सोबत करून देतो' असे म्हणुन लग्न करून न देता पीडितेची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एन), 420, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक हरिचंद्र गावडे 8424043135 हे करीत आहे.

### आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 09 कि.मी. अंतरावर मौजा जुनापाणी येथे दिनांक 14/03/2020 चे 12.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ कमला प्रल्हाद घागरे, वय 60 वर्ष, रा. जुनापाणी ता. काटोल जि. नागपुर यांचा मुलगा नामे– अरून प्रल्हाद घागरे(मृतक), वय 24 वर्ष याने 4 महिण्यापुर्वीच गावातील आरोपी नामे– गुणवंता खवसे, वय 45 वर्ष, रा. जुनापाणी ता. काटोल जि नागपूर याला बोलेरो गाडी खरेदीचे पुर्ण पैसे दिले होते. परंतु यातील आरोपी हा पुर्ण पैसे मिळुनही गाडी नावावर करून देत नव्हता व पुर्ण पैसे मिळाले नाही म्हणून त्रास देत होता. त्यामुळे फिर्यादीच्या मुलाला 'जगावेसे वाटत नाही, जिव दयाव वाटते' असे म्हणायचा. अशा आरोपीच्या त्रासाला कंटाळून अरून घागरे याने स्वतःचे घरी गळफास लावुन मरण पावण्यास आरोपी हा कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी विरुध्द कलम 306 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. श्याम गव्हाने 9923756383 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर